Publication: Navshakti
Date: 27/6/2019
Page: 14
Column: 1

नवशक्ति
मुंबई, गुरुवार, २७ जून २०१९

# एईएमएलतर्फे सुलभ बिल भरणासाठी 'जिनिअस पे किओस्क' सादर

मुंबई – ग्राहककेंद्री दृष्टिकोनाप्रती आपली कटिबद्धता कायम राखत अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.ने (एईएमएल) आज सुलभ बिल भरणासाठी स्वयं–देयक किओस्क 'जिनिअस पे' सादर केले. शिवसेनेचे नगरसेवक उपेंद्र सावंत आणि जयंत दांडेकरसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संतोष देसाई यांच्या उपस्थितीमध्ये आमदार सुनिल राऊत यांच्या हस्ते विक्रोळीमधील टागोर नगर येथे पहिल्या जिनिअर पे सेवेचे उद्घाटन झाले. 'जिनिअस पे'च्या सादरीकरणासह एईएमएलने बिल भरण्याची प्रक्रिया सुलभ केली आहे. ग्राहकांना आता अधिक काळ रांगांमध्ये उभे राहावे लागणार नाही. मुंबईतील ग्राहकांच्या सोईस्कर ठिकाणी जिनिअस पे किओस्क स्थापित करण्यात येतील आणि धनादेश, रोख, डेबिट/क्रेडिट कार्डसच्या माध्यामतून देयके स्वीकारण्यात येतील. एईएमएल मुंबईभरात जिनिअस पे किओस्क स्थापित करतील, ज्यामुळे ग्राहक त्यांच्यापासून ५ मिनिटांच्या जवळच्या अंतरावर असलेल्या ठिकाणी त्वरित देयके भरण्यासाठी या स्मार्ट, त्रासमुक्त आणि इंटरॲक्टिव्ह डिजिटल किओस्क यंत्रणेचा वापर करू शकतात. ग्राहकांसाठी जिनिअस पे सेवा रोज सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत उपलब्ध असेल. ग्राहक किओस्क मशिन्सच्या माध्यमातून बिलांच्या डुप्लिकेट कॉपीज देखील प्राप्त करू शकतात.एईएमएल सातत्याने नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या माध्यमातून ग्राहक सेवा सुधारत आली आहे. 'जिनिअस पे' या स्मार्ट, त्रासमुक्त आणि इंटरॲक्टिव्ह यंत्रणेसह एईएमएलने ग्राहक सेवा वाढवण्यासाठी चॅटबोट, वॉईसबोट, बिझनेससाठी व्हॉट्सअप आणि ऑटोमेटेड आयव्हीआर अशा उपयोगी सेवा देखील सादर केल्या आहेत.